**A**

**CCE RR/PR/PF/**
**NSR/NSPR**
**FULL SYLLABUS**

# ಕರ್ನಾಟಕ ಶಾಲಾ ಪರೀಕ್ಷೆ ಮತ್ತು ಮೌಲ್ಯನಿರ್ಣಯ ಮಂಡಲಿ, ಮಲ್ಲೇಶ್ವರಂ, ಬೆಂಗಳೂರು – 560 003

# KARNATAKA SCHOOL EXAMINATION AND ASSESSMENT BOARD, MALLESHWARAM, BENGALURU – 560 003

**ಆಗಸ್ಟ್ 2024 ರ ಪರೀಕ್ಷೆ - 3**

**AUGUST 2024 EXAMINATION - 3**

## ಮಾದರಿ ಉತ್ತರಗಳು

## MODEL ANSWERS

**ಸಂಕೇತ ಸಂಖ್ಯೆ : 08-M** **Code No. : 08-M**

## ವಿಷಯ : ಪ್ರಥಮ ಭಾಷೆ — ಮರಾಠಿ

## Subject : First Language — MARATHI

**( ಶಾಲಾ ಪುನರಾವರ್ತಿತ ಅಭ್ಯರ್ಥಿ / ಖಾಸಗಿ ಪುನರಾವರ್ತಿತ ಅಭ್ಯರ್ಥಿ / ಖಾಸಗಿ ಅಭ್ಯರ್ಥಿ / ಎನ್.ಎಸ್.ಆರ್. / ಎನ್.ಎಸ್.ಪಿ.ಆರ್.)**

**( Regular Repeater / Private Repeater / Private Fresh / NSR / NSPR )**

**ದಿನಾಂಕ : 02. 08. 2024 ]** **[ ಗರಿಷ್ಠ ಅಂಕಗಳು : 100**

**Date : 02. 08. 2024 ]** **[ Max. Marks : 100**

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| I. | **पुढील प्रश्नांना प्रत्येकी चार पर्याय दिलेले आहेत. त्यापैकी योग्य पर्याय निवडून उत्तर लिहा : 6 × 1 = 6** | |
| 1. | 'दुर्बळ' या संधीचा विग्रह असा होतो –<br>(अ) दुः + बळ (ब) दु + बळ<br>(क) दुर्ब + ळ (ड) दि + बळ<br>**उत्तर :** (अ) दुः + बळ | 1 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 2. | 'आदुने लाडू खाल्ला' या वाक्यातील काळ ओळखा.<br>(अ) भविष्यकाळ (ब) वर्तमानकाळ<br>(क) भूतकाळ (ड) पूर्ण भविष्यकाळ<br>**उत्तर :** (क) भूतकाळ | 1 |
| 3. | 'शितावरून ........... परीक्षा.' म्हण पूर्ण करा.<br>(अ) ताकाची (ब) वरणाची<br>(क) दुधाची (ड) भाताची<br>**उत्तर :** (ड) भाताची | 1 |
| 4. | 'दगडावर कोरलेला लेख' या शब्दसमूहासाठी एक शब्द हा आहे –<br>(अ) वस्त्रालेख (ब) शिलालेख<br>(क) ताम्रलेख (ड) पत्रालेख<br>**उत्तर :** (ब) शिलालेख | 1 |
| 5. | '<u>आराध्या</u> गाणे गाते' या वाक्यातील अधोरेखित शब्दाची जात ही आहे –<br>(अ) नाम (ब) सर्वनाम<br>(क) विशेषण (ड) क्रियापद<br>**उत्तर :** (अ) नाम | 1 |
| 6. | खालीलपैकी 'वृक्ष' या शब्दाचा समानार्थी शब्द हा आहे –<br>(अ) ढग (ब) वारा<br>(क) वेल (ड) झाड<br>**उत्तर :** (ड) झाड | 1 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| **II.** | **पहिल्या दोन पदांचा संबंध ओळखून तिसऱ्या पदाशी जुळणारा संबंधित शब्द लिहा** : **4 × 1 = 4** | |
| 7. | त, ई, आ : सप्तमी विभक्ती :: ऊन, हून : ……………… <br> **उत्तर :** पंचमी विभक्ती | 1 |
| 8. | पोलिसांनी चोर पकडला : कर्मणी प्रयोग :: गाय चारा खाते : ……………… <br> **उत्तर :** कर्तरी प्रयोग | 1 |
| 9. | लंबोदर : बहुव्रीहि समास :: घरोघरी : ……………… <br> **उत्तर :** अव्ययीभाव समास | 1 |
| 10. | साक्षर : निरक्षर :: ज्ञानी : ……………… <br> **उत्तर :** अज्ञानी | 1 |
| **III.** | **खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा** : **7 × 1 = 7** | |
| 11. | वसईचा किल्ला घेण्यासाठी चिमाजी अप्पांनी किती वर्षे प्रयत्न केले ? <br> **उत्तर :** तीन वर्षे | 1 |
| 12. | बालपरवेशी म्हणजे काय ? <br> **उत्तर :** लढाईत मरण पावलेल्या सैनिकांच्या मुलांच्या संगोपनासाठी दिलेला बैठा पगार, जमीन इत्यादी | 1 |
| 13. | माणूस विद्येचा पुजारी केव्हा होईल ? <br> **उत्तर :** जेव्हा तो पुस्तकावर प्रेम करील. | 1 |
| 14. | 'पाहुणे' ही कविता कोणत्या काव्यसंग्रहातून निवडली आहे ? <br> **उत्तर :** 'झेंडूची फुले' | 1 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 15. | पृथ्वीला कशाचे भूषण वाटते ?<br>**उत्तर :** 'धुळीचे' | 1 |
| 16. | भर दुपारी कुणाची रांग लागते ?<br>**उत्तर :** 'पाणी वाहणाऱ्या बायकांची' | 1 |
| 17. | पाहुणे बाबांच्या पेटीतून कशाचे जुडगे पळवितात ?<br>**उत्तर :** विड्यांचे | 1 |
| **IV.** | **खालील प्रश्नांची सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा : 3 × 2 = 6** | |
| 18. | खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा :<br>(अ) तारीफ करणे.<br>(ब) इशारा देणे.<br>**उत्तर :** (अ) तारीफ करणे = प्रशंसा करणे, कौतुक करणे 1<br>(ब) इशारा देणे = सूचना देणे 1<br>(वाक्प्रचारांचा वाक्यात उपयोग व्हावा अर्थाचा नव्हे)<br>( अर्थ $\frac{1}{2}$ गुण, वाक्यात उपयोग $\frac{1}{2}$ गुण ) | 2 |
| 19. | अलंकार ओळखून लक्षणे सांगा.<br>'विद्या ही महासागरासारखी आहे.'<br>**उत्तर :** **अलंकार** – उपमा अलंकार 1<br>**लक्षणे –** दोन वस्तुतील साम्य चमत्कृतिपूर्ण रीतिने जेथे वर्णन केलेले असते तेथे उपमा अलंकार होतो. उपमा अलंकारात 'सारखा', 'प्रमाणे' असे शब्द येतात म्हणून. 1 | 2 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 20. | गण पाडून वृत्त ओळखा :<br>'उपवन जल केली जे कराया मिळाले.'<br>**उत्तर :** उपव नजल केलीजे कराया मिळाले<br>U U U U U U – – – U – – U – – 1<br>न न म य य<br>वृत्त – 'मालिनी'<br>अक्षरे – 15<br>गण – न – न – म – य – य 1<br>यती – 8, 15 व्या अक्षरावर | 2 |
| **V.** | **खालील प्रश्नांची उत्तरे दोन ते तीन वाक्यात लिहा :**<br>**7 × 2 = 14** | |
| 21. | हत्तीच्या दृष्टांत कथेचे तात्पर्य लिहा.<br>**उत्तर :** ज्याला जी शक्ती प्रकाशली, त्या शक्तीलाच तो परमेश्वर मानतो. ज्ञानी मनुष्याला ती एक परमेश्वराची एक शक्ती वाटते. पण परमेश्वर नव्हे अशा सर्व शक्तींनी युक्त परमेश्वर असतो. | 2 |
| 22. | डॉ० बाबासाहेब आंबेडकर यांचा थोडक्यात परिचय लिहा.<br>**उत्तर :** पूर्ण नाव – डॉ. भीमराव रामजी आंबेडकर ( 1891-1956 )<br>* स्वतंत्र भारताचे पहिले कायदेमंत्री<br>* भारतीय घटनेचे शिल्पकार – क्रांतीकारक<br>महापुरुष – विविध ज्ञानशाखावर प्रभुत्व, जनता, मूकनायक – नियतकालिकाचे संपादक<br>प्रसिद्ध ग्रंथ – हू वेअर दि शूद्राज, बुद्ध अॅण्ड हिज धम्म इ. भारतरत्न पुरस्काराने सन्मानित (1990) | 2 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 23. | ''एक शूद्र बाई शिक्षिका म्हणून शिकवायला लागली. महाभयंकर !'' संदर्भासह स्पष्टीकरण करा.<br>**उत्तर :** **संदर्भ :** पाठाचे नाव – 'क्रांतिज्योती सावित्रिबाई'<br>**लेखिका** – सुषमा देशपांडे<br>लोकांनी सावित्रीबाईंना म्हटले<br>**स्पष्टीकरण –** सावित्रीबाई स्वतः घरी शिकतात.<br>शिक्षिका म्हणून कार्य करतात.<br>त्यावेळी समाजाने त्यांची केलेली अवहेलना.<br>तरी जिद्दीने शिक्षणाचे कार्य चालू ठेवतात. | 2 |
| 24. | अण्णाने काय-काय करावे असे आईस वाटे ?<br>**उत्तर :** अण्णाने दारु सोडावी. रोज कामाला जावे-पैसे मिळवावेत - संसारासाठी वापरावेत - पोरांना शिक्षणासाठी द्यावेत. घर बांधावं, पोरांना कपडे द्यावेत पण अण्णाला काहीच वाटत नसे. | 2 |
| 25. | कवी कावळ्याला कोणकोणत्या गोष्टी देऊ करतो ?<br>**उत्तर :** हवे असलेला शकुन सांगितला तर –<br>दहीभाताचा घास, वाटीभर दूध, रसभरित<br>आंबे, सोन्याने पाय मढविणार आहेत. | 2 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 26. | कवी कुसुमाग्रज यांचा थोडक्यात परिचय लिहा.<br>**उत्तर :** पूर्ण नाव–विष्णू वामन शिरवाडकर (1922 - 1999)<br>* अग्नि संप्रदायी, मानवतावादी कवी.<br>* काव्यसंग्रह → जीवनलहरी 'विशाखा' 'किनारा'इ.<br>* कादंबऱ्या → 'वैष्णवी', 'जान्हवी', 'कल्पनेच्या तीरावर'<br>* नाटके – 'दुसरा पेशवा', 'कौंतेय' 'राजमुकुट' 'नटसम्राट' 'वीज म्हणाली धरतीला' इ.<br>* फूलवाली ( लघुकथा संग्रह ), 'समिधा' ( गद्यकाव्य संग्रह )<br>* भावनाशीलता, ओजस्वी भाषाशैली, उत्तुंग कल्पनाविलास ही काव्यलेखनाची वैशिष्ट्ये<br>* 'ज्ञानपीठ' पुरस्काराचे ( 1987 ) मानकरी. | 2 |
| 27. | 'विठ्ठला विठ्ठला । आम्ही अन्नभक्त'<br>संदर्भासह स्पष्टीकरण करा.<br>**उत्तर :** **संदर्भ :** कवितेचे नाव – पाठ आणि पोट यांचा झाला टाळ<br>कवी – विंदा करंदीकर<br>भुकेलेल्या जीवांनी देवाला केलेली विनवणी.<br>**स्पष्टीकरण –** भुके जीवांची अन्नासाठीची धडपड<br>– पोटासाठी वाटेल ते करण्याची तयारी<br>– अन्नभक्त असल्याचा इशारा देतात. | 2 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| VI. | **खालीलपैकी कोणत्याही एका कल्पनेचा विस्तार करा :** **1 × 3 = 3** | |
| 28. | (अ) वनश्री हीच खरी धनश्री.<br>**किंवा**<br>(ब) जया अंगी मोठेपण तथा यातना कठीण.<br>**उत्तर : कल्पना विस्ताराचे मुद्दे :**<br>i) कल्पनेचा अर्थ सांगणे 1<br>ii) उदाहरण व स्पष्टीकरण $1\frac{1}{2}$<br>iii) तात्पर्य $\frac{1}{2}$ | 3 |
| VII. | **खालील प्रश्नांची उत्तरे पाच–सहा वाक्यात लिहा :** **10 × 3 = 30** | |
| 29. | लेखकाच्या मते छत्री घेण्याचा खरा उद्देश कोणता असतो ?<br>**उत्तर :** स्वतः चा पाण्यापासून बचाव करणे हा उद्देश वाटतो पण ती फसवणूक असते.<br>**खरा उद्देश –**<br>* 'का हो, भिजत चाललात ? छत्री नाही वाटतं ?' असे कुणी विचारु नये.<br>* 'कोण वेडा हा !' अशा अर्थाने टकमक पाहू नये हाच उद्देश असतो. | 3 |
| 30. | आदिवासी मुलांना 'पर्यावरण' या विषयाच महत्व डॉक्टर कसे पटवून देत ?<br>**उत्तर :** तुम्हीच जंगल संपत्तीचे खरे मालक आहात – वाडवडीलांनी त्याच संवर्धन, संरक्षण केल – शहरातील लोकांना निसर्ग अप्रूप वाटत – म्हणून शहरात न जाता येथे राहून अर्थार्जन करण्याचा सल्ला देतात. | 3 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 31. | चाफ्याच्या झाडाला लेखक 'बडी माँ' असे का म्हणतात ? त्याची गंमत कोणती ?<br>**उत्तर :** * चाफ्याच्या झाडाचं पानं तोडलं की दुधासारखा पांढरा चीक निघतो म्हणून 'बडी माँ' म्हणतात.<br>* पान आले की फुले नसतात. फुले असलेकी पान नसतात हा पानाफुलांचा लंपडाव ही त्याची गंमत. | 3 |
| 32. | गणातात्यांना धाकट्या मुलाचा राग का येत होता ? सविस्तर लिहा.<br>**उत्तर :** धाकटा मुलगा वारंवार लंगोटीभर जमिन या शब्दात तात्यांची हेटाळणी करतो – पण वास्तविक निम्मि जमिन तात्यानी स्वतः काबाडकष्ट करून कमावली होती. हे शब्द मनाला खूप झोंबले म्हणून त्याचा राग येतो. | 3 |
| 33. | 'स्वरगंगा' या पाठाच्या आधारे धारवाडच्या राष्ट्रीय विद्यालयाचे वर्णन करा.<br>**उत्तर :** गंगूबाईचे शिक्षण याच विद्यालयात झाले. द. रा. बेंद्रे हे शाळेचे मुख्याध्यापक होते. ते स्वतः उत्तम कवी असल्याने त्यांचे मार्गदर्शन मिळायचे. येथे मोठे साहित्यिक, राजकारणी येत असत. राष्ट्रीय शाळेत वंदे मातरम ही प्रार्थना असे. येथे टिळकांना गंगूबाईनी पाहिले. देशप्रेमाचे धडे घेतले. | 3 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 34. | श्रीकृष्णाची प्राप्ती न झाल्यास रूक्मिणी काय करणार आहे ?<br>**उत्तर :** जीव हासडून जीव देणार आहे. पुढे शंभर जन्म घेऊन उग्र तपश्चर्या करणार आहे. शेवटी श्रीकृष्णालाच प्राप्त करणार आहे. | 3 |
| 35. | धर्माच्या नावाखाली ढोंगी साधूचे वर्तन कसे असते ?<br>**उत्तर :** ढोंगी साधू मनातून परमेश्वराची भक्ती न करता केवळ भक्तीचे ढोंग करतो. भगवे वस्त्र धारण करतो. गळ्यात माळा, डोक्यावर टोपी, गंधाचा टिळा लावतो. हातात दंडकमंडलू घेऊन प्रदर्शन करतो. जप करतो, होमहवन करतो, प्राण्यांचे बळी घेतो. लोकाना खूप फसवितो. | 3 |
| 36. | कविने कर्ण, कृष्ण आणि मार्कंडेय यांचे दाखले का दिले आहेत ? ते स्पष्ट करा.<br>**उत्तर :** **कर्ण –** कुरुक्षेत्रावर रथहीन झाला असतानाही धैर्याने लढतो व वीरमरण प्राप्त करतो – त्याप्रमाणे सैनिक लढतात.<br>**कृष्ण –** गोंधळलेल्या अर्जुनाला रणांगणावर योग्य मार्गदर्शन करुन लढण्यास प्रवृत्त करतो तसे संत मार्गदर्शन करतात.<br>**मार्कंडेय –** अल्पायुषी असताना – शंकराची उपासना करुन दीर्घायुषी होतो तसे देशभक्तही स्वतःची पर्वा न करता देशासाठी आत्मबलिदान देऊन अमरत्व मिळवतात म्हणून. | 3 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 37. | 'नेनंता गुराखी' या कवितेतील गुराख्याचे वर्णन करा.<br>**उत्तर :** गुराखी खूप अज्ञानी आहे. लहान वयात गुरे राखण्याची वेळ येते. काटयाकुपाटीत जातो. पायाला काटे मोडतात. पावसात गायीच्या पोटाचा आसरा घेतो. त्यांच्या पाठीवरुन हात फिरवतो आनंदाने हसत खेळत गुरे राखतो. कोणतीही अपेक्षा करत नाही गुरे पांगतात तेव्हा त्यांना एकत्र करताना रागाला येतो गाईची पाठ बडवून काढतो कधी रडत बसतो अशाप्रकारे वर्णन आले आहे. | 3 |
| 38. | 'धरण' या कवितेचा थोडक्यात आशय लिहा.<br>**उत्तर :** प्रस्तुत कवितेत सामान्य कष्टकरी स्त्रियांच्या वेदना व्यक्त झाल्या आहेत – पहाटे उठून दळण कांडण करते. लहान बाळाला टोपलीखाली झोपवून काम करते. उन्हात पायाला झाडाची पाने बांधून राबते. मात्र घोटभर पाण्यासाठी तिला रानोमाळ फिरावं लागते. लोकांची खूप भरभराट होते. मात्र तिची आर्थिक स्थिती निराशाजनकच राहते. | 3 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| **VIII.** | **खालील प्रश्नांची उत्तरे आठ–दहा वाक्यात लिहा : 4 × 4 = 16** | |
| 39. | लेखकाच्या घरी काकूंचे आगमन कसे झाले ? <br> **किंवा** <br> लेखकाने काकूंना कामावरुन काढून का टाकले ? सविस्तर लिहा. <br> **उत्तर :** ठरविलेल्या दिवशी सकाळी बैलाच्या छकडयातून काकूबाई येतात. सोबत दोन ट्रंका, छानदार वळकटी, पाण्याचा खुजा, वाजविण्याची पेटी. पोपटाचा पितळी पिंजरा, पोपट, बोका या सर्व गोष्टी घेऊन येतात. स्वतः मागील ट्रंकवर बसलेल्या, डाव्या बगलेत बोका, हातात पोपटाचा पिंजरा होता. अशा प्रकारे आगमन होते. <br> **किंवा** <br> काकू स्वयंपाकासाठी आली खरी पण ती काम सोडून आपला जास्त वेळ भजन, देवपूजा यातच घालवत होती. घरातील माणसांकडून उलट कामे करून घेत होती. छोटया छोटया गोष्टीवरुन आकांत मांडत होती. इतर घरातील कामाला नकार देत होती. नोकराणी असून मालकिणीसारखी वागत होती. वस्तू चोरुन घेत होती. या सर्व गोष्टींना कंटाळून कामावरून काढून टाकतात. | 4 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 40. | 'जपानी स्त्री' या पाठाच्या आधारे जपानी स्त्रीचे स्वभाववैशिष्ट्ये लिहा.<br>**किंवा**<br>'मदर्स युनियन' या संस्थेची माहिती लिहा.<br>**उत्तर :** जपानी स्त्री गोड, हसरी, लाघवी, शालीन आहे.<br>* सर्वच क्षेत्रात पुढारलेली आहे – ती कोणतेही काम छोटे–मोठे न समजता कप विसळण्यापासून केस कापण्यापर्यंतची सर्व कामे निर्भयपणे करते.<br>* स्वतःच्या लग्नासाठीचे पैसा गोळा करायला तिला लाज वाटत नाही.<br>* सर्व सुविधा घरात असाव्यात हा तिचा हट्ट आहे.<br>* तिने स्वतःच्या अनेक संघटना तयार करुन स्वावलंबी बनली आहे.<br>* ती स्वभावाने खूप विनम्र आहे व निर्भय आहे.<br>**किंवा**<br>* मदर्स युनियन तीन मजली संस्था.<br>* पहिला मजला – संस्थेच ऑफिस, दुसरा मजला – पालकांची संस्था.<br>* तिसरा मजला – शिक्षक संघटनेच ऑफिस.<br>* अध्यक्षा – 70 - 75 वर्षाच्या खूपच समाधानी.<br>* संस्थेचा हेतू – बॉम्ब हल्ल्यामुळे घरादाराविना आईबापाविना पोरक्या झालेल्या मुलांना आश्रय देणे. | 4 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 41. | 'या भारतात बंधुभाव' या कवितेचा सारांश तुमच्या शब्दात लिहा.<br><br>**उत्तर :** प्रस्तुत कवितेत भारतात एकता, बंधुभाव नांदावा अशी अपेक्षा कविने व्यक्त केली आहे. सर्वधर्मसमभाव रहावा, अस्पृश्यता, जातीयता नष्ट व्हावी, गरीब-श्रीमंत सर्वांनी गुण्यागोविदाने रहावे - सामूहिक प्रार्थना व्हाव्यात. देशातील तरुण उद्योगी व शीलवान असावा. सर्वांना स्वातंत्र्याचे सुख मिळावे. दुष्टाच्या मनातही न्यायाची भावना असावी. घरोघरी स्वर्गिय आनंद नांदावा. समाधानी, वैभवशाली समाजाची अपेक्षा कवी व्यक्त करतात. तसा आशीर्वाद परमेश्वराकडे मागतात. | 4 |
| 42. | खालील कवितेच्या ओळी पूर्ण करा :<br><br>कवच भूमिचे ...............................<br><br>...............................................<br><br>...............................................<br><br>.............................. श्रद्धेचा अंकुर.<br><br>**किंवा** | |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| | कोसळली सर ................................<br><br>................................................<br><br>................................................<br><br>...................................... सत्कार.<br><br>**उत्तर :** कवच भूमिचे आणि अचानक<br>भेदुनि आले हिरवे कौतुक<br>नचिकेताचे स्वप्न च अथवा अवचित हो साकार<br>पहिल्या हिरव्या तृणपात्याचा आज असे सत्कार<br>मातीची ही मात मृत्युवर<br>मृत्युंजय श्रद्धेचा अंकुर.<br><br>**किंवा**<br><br>कोसळली सर दक्षिण उत्तर<br>घमघमले मातीतून अत्तर<br>अष्टदिशातून अभीष्टचिंतन, घुमला जयजयकार<br>पहिल्या हिरव्या तृणपात्याचा आज असे सत्कार. | 4 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| **IX.** | **खाली दिलेला उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दात लिहा : 1 × 4 = 4** | |
| 43. | जनसेवा अनेक मार्गाने करता येते. कुणासाठी कष्ट करून तर कुणासाठी पैशाची मदत करून तर कोणाला कठीण प्रसंगी प्रत्यक्ष स्वतः वेळ देऊन इतरांची सेवा करता येते. कोणी दुःखी असेल तर आपल्या गोड स्वभावाने त्याच्या दुःखी मनाला फुंकर घालून ते कमी करण्याचा प्रयत्न करणे ही सुद्धा एकप्रकारची सेवाच होय. अशा सेवेची फळे अंती चांगलीच मिळतात. दीन, दुबळे, अनाथ, अपंग यांच्या रूपात परमेश्वराचे दर्शन घडते. प्रत्यक्ष परमेश्वर दिसतो. असा याचा अर्थ नाही. परमेश्वर कोणत्याही स्वरूपात दिसत नाही. तो अमूर्त आहे. दुसऱ्याच्या सुखासाठी चांगले काम केले तर कळत नकळत आपल्या मनाला सात्विक समाधान मिळते आणि हे समाधान हाच परमेश्वराचा प्रसाद असतो. म्हणूनच 'जनसेवा हीच ईश्वरसेवा' असे म्हटले जाते. | |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| | **प्रश्न :**<br>(अ) जनसेवा कोणकोणत्या प्रकारे करता येते ? 2<br>(ब) 'जनसेवा हीच ईश्वरसेवा' असे का म्हटले जाते ? 2<br>**उत्तर :**<br>(अ) कोणासाठी प्रत्यक्ष कष्ट करून, कोणासाठी पैशाच्या स्वरूपात मदत करून इतरांची सेवा करता येते. दुःखितांना आधार देणे, आपला अमूल्य वेळ देऊन सहकार्य करणे ही देखील सेवाच आहे. अशा अनेक मार्गांनी जनसेवा करता येते. 2<br>(ब) जनसेवा केल्यामुळे, दुसऱ्याच्या सुखासाठी चांगले काम केल्यामुळे कळत नकळत आपल्या मनाला सात्विक समाधान मिळते. हाच परमेश्वराचा खरा कृपाप्रसाद असतो. इतरासांठी चांगली भावना ठेवली तर आपले चांगलेच होते. दीन दुबळ्यांच्या सेवेत परमेश्वर सेवेचा आनंद मिळतो. 'म्हणून जनसेवा हीच ईश्वरसेवा' असे म्हटले जाते. 2 | 4 |

<table>
<tr><th>प्रश्न क्रमांक</th><th>अचूक उत्तरे</th><th>गुण</th></tr>
<tr><td>X.<br><br>44.</td><td>खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पत्रलेखन करा :<br>1 × 5 = 5<br><br>तुमच्या लहान भावाला / बहीणीला वाचनाचे महत्व पटवून देणारे पत्र लिहा.<br><br>किंवा<br><br>दहावीचे गुणपत्रक मिळविण्यासाठी शाळेच्या मुख्याध्यापकांना अर्ज लिहा.<br><br>उत्तर : पत्रलेखन :<br>i) प्रेषक पत्ता ( पाठविणाऱ्याचा पत्ता तारखेसह) 1<br>ii) मायना 1<br>iii) विषय मांडणी व भाषा सजावट 2<br>iv) समारोप व स्वाक्षरी $\frac{1}{2}$<br>v) कोणाला पत्र पाठवायचे त्याचा पत्ता. $\frac{1}{2}$<br><br>किंवा<br><br>पत्र :<br>i) प्रेषक पत्ता (अर्ज लिहिणाऱ्याचा पत्ता, दिनांक) 1<br>ii) मायना (अधिकाऱ्याचा हुद्दा) 1<br>iii) विषय $\frac{1}{2}$<br>iv) मजकूर 2<br>v) सही व पत्ता. $\frac{1}{2}$</td><td><br><br><br><br><br><br><br><br><br><br><br><br><br>5<br><br><br><br><br><br><br><br><br><br>5</td></tr>
</table>

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| **XI.** | **खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पंधरा ते बीस ओळी निबंध लेखन करा : 1 × 5 = 5** | |
| 45. | (अ) आई थोर तुझे उपकार.<br>(ब) मी शिक्षक झालो तर !<br>**उत्तर : निबंध लेखनाचे मुद्दे**<br>i) आकर्षक प्रारंभ 1<br>ii) विषय ज्ञान 2<br>iii) भाषा सौंदर्य 1<br>iv) शेवट. 1 | 5 |